
नीलिमाताईंच्या कविता वाचताना
मुलांचं जग भोवताली फेर धरतं
मोठं होण्याची उत्सुकता, शाळेतल्या गमती,
चेटकिणीची भीती, हवेतला पाळणा,
भाषेचं कुतूहल,
आजीनं केलेलं पत्राचं कौतुक !
कशा बरं इतक्या छान कविता करतात नीलिमाताई !
पहा बरं, या कविता वाचता वाचता
तुम्हालाही एखादी कविता सुचून जाईल !
कविता करण्याचा, सुचण्याचा, वाचण्याचा
आणि ऐकण्याचाही
आनंद खूप सुंदर असतो !

- *शोभा भागवत*

दुधाचे दात

- डॉ. नीलिमा गुंडी



दुधाचे दात

© डॉ. नीलिमा गुंडी
३, 'अन्नपूर्णा'
१२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी क्रमांक : २४४८६०१५

❒ प्रकाशक :
कजा कजा मरू प्रकाशन
गरवारे बालभवन,
सारसबागेसमोर, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी क्रमांक : २४४४२१०९

सौजन्य :
रमेश गरवारे चॅरिटी ट्रस्ट

❒ प्रकाशन वर्ष : २००६

❒ आतील रेखाचित्रे :
मेघना गोखले

❒ मुखपृष्ठ :
रसिका काळे

❒ मुद्रक :
मंजिरी नागपूरकर
स्क्रिप्ट आर्ट,
९१४ सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

❒ किंमत : २५/-

❒ पूर्वप्रसिद्धी :
सकाळ, लोकसत्ता, निर्मळ रानवारा, प्रतिबिंब आयुष्याचे इत्यादी.

या कविता
बालभवनमध्ये मजा मजा करणाऱ्या
दोस्तांना भेट...

नीलिमाताई

अनुक्रमणिका

दुधाचे दात



बागेत काठी टेकत
आले माझे आजोबा
खांद्यावर हात ठेवून
म्हणतात कसे, ''पिंटोबा,


काय चाललंय तुझं ?
येतोस का जरा आत ?
सांगीन म्हणतो तुला
माझ्या मनातली बात !''

सांगत होते काय काय......
त्यांचे लहानपण,
नोकरीसाठी त्यांनी
केली कशी वणवण......

कालपासून आजोबा
मित्रासारखे वागतात !
कालच नाही का पडले
माझे दुधाचे दात !




गणिताची गंमत




गणिताच्या तासाला
काय गंमत झाली...:
बाईंनी दिली गणिते
नि मुलींनी नावे लिहिली

लोणी आणि पाणी यांची
बेरीज केली कोणी
कोणी मोजली एकत्र
गाणी आणि नाणी



वजाबाकी करताना तर
खूपच मजा आली...
आईपेक्षा मुलगीच
वयाने मोठी ठरली !



बाई म्हणाल्या, ''तुम्ही
मुली आहात धन्य !
उत्तर बरोबर तरी
गुण तुम्हाला शून्य !''




जादू



वीतभर नखे
नि हातभर जटा
चेटकिणीच्या वाड्यात
भुयारी वाटा

फिरवते डोळे
पुटपुटते मंत्र...
माणसाचे मांजर
करायचे तंत्र !



तिच्या या जादूला
आम्ही नाही भीत
शाळेत जाऊन
आम्ही झालो धीट !


खरं तर जगात
छान जादू असते...
एवढ्याशा बाळाला
मोठ्ठा माणूस करते !



तिकीट




तिकिटे जमवण्याचा
छंद आहे मला भारी
देशोदेशीची कितीतरी
तिकिटे माझ्या घरी





तिकिटावर असतात
चित्रे कशाकशाची...
फुलांची नि पक्ष्यांची
मोठमोठ्या लोकांची !



तिकीट लागता पत्राचा
प्रवास होतो सुरू
न्यूयॉर्क ते बुद्रुक...
पत्र जाते तुरुतरु !








आई म्हणते ''गर्दीतून,
जाईल ना हा नीट ?''
बाबा म्हणतात, ''डकवू या
डोक्यावर तिकीट !''



पाळणा (रोप वे)




गार हवेचे बोट धरून
मी बसते पाळण्यात,
सोडत नाही बोट माझे
आई जरी येते आत !




इकडून तिकडे दोरीवरून
पाळणा जातो भर्रकन,
पोटामध्ये माझ्या कसा
खड्डा पडतो धपऽकन !

खाली येते खोल दरी
वाटे, आपण अधांतरी
हसत राहते वरवर
वाटते मला भीती खरी !

पाळणा थांबतो एकदाचा
हुश्श करत बाहेर येते
भीती आणि मस्तीमध्ये
मी मनात झुलत राहते !



सावली




जाईन तिथे माझ्याबरोबर
कोण असते सारखी ही ?
कधी लहान, कधी मोठी
अशी कशी होत राही ?

घाबरते की काय ही ?
राहते मला अगदी चिकटून !
चिडवते की काय मला ?
माझ्यासारखे सारे करून !




उजेडात खेळ हिचे
अंधारात कोठे लपते ?
इतकी जवळ असते तरी
सारखी गप्प का बसते ?

आई म्हणते हसून,
''ती तुझी आहे सावली !
तुझ्याभोवती तुझे रूप
घेऊन फिरते भावली !''




आजोळ



दाराशीच कळते -
आजोळ असते आगळे !
स्वागताला अंगणात
रांगोळीतली फुले !

ओटीवरती पापड
वाळवण आजीचे
काम करतानाही
बारीक लक्ष तिचे



माजघरात तिचा
असतो सतत वावर
गोधडीच्यासाठी
अंथरते ती थर

तिची शिवण घट्ट
गाठ टोचत नाही
जुने पुराणे सारे
धागा जोडत राही !



वाचन करता करता
आजोबा म्हणतात, ''चला
उद्या आपण जाऊ
नाटक पाहायला !''


काय असते जादू
कोण जाणे घरभर !
रोजची कडक आई
होते मुलगी खेळकर !

गुपित




फळीवर डबा,
डब्यात लाडू,
लाडवात बेदाणे,
खाऊ या चला !


अंगणात झाड,
झाडावर घरटं,
घरट्यात पिल्लू
पाहू या चला !



कपाटात पुस्तक,
पुस्तकात गोष्ट,
गोष्टीत चित्र,
रंगवू या चला !




गच्चीवर दोस्त
दोस्तांचे खेळ,
खेळातलं राज्य,
घेऊ या चला !




शेकोटीशी आजी,
आजीच्या गप्पा,
गप्पातलं गुपित
ऐकू या चला !

गवत



मऊ मऊ झुबकेदार
हे तर आहे गवत
झुळूक येताच कसे
खुषीत राही डोलत




बागेत पायाखाली
त्याचाच गालिचा
एका क्षणात जाई
शीण डोळ्यांचा




त्याला कुठे कसले
कोडकौतुक लागते ?
दगडाच्या फटीतून
दाढीसारखे लोंबते !






जमिनीवर पडतात
पावसाच्या धारा
गवत ? छे ! मातीचा
हा तर शहारा !



काय काय एकेक तऱ्हा !

आमच्यात किनई
फटकाही मारतात,
उड्याही मारतात,
आईला लाडात
मिठीही मारतात !
शब्दांच्या असल्या
काय काय एकेक तऱ्हा !



आमच्यात किनई
चटणीही वाटतात,
खाऊही वाटतात,
मनात तर माझ्या
काय काय वाटतं !
शब्दांच्या असल्या
काय काय एकेक तऱ्हा !



आमच्यात किनई
घंटाही वाजते,
थंडीही वाजते,
ताईदादाचं तर
अधूनमधून वाजतं !
शब्दांच्या असल्या
काय काय एकेक तऱ्हा !



आकाशाचा तंबू

आकाशाचा तंबू, बिनखांबाचा
ढगांचा खेळ, चाले कसरतीचा

उंचावरती आहे, ढगांचे राज्य
झाडे चिडीचूप, पाहायला सज्ज


डोंगराच्या टकलाला, गुदगुल्या करतात
सूर्याच्या किरणांना, दडवून ठेवतात

मऊ मऊ ढगांचा, तरंगता गालिचा
कधी पडणार पाय, चंदाराणीचा ?

अंधाराचा पडदा, पडलाच शेवटी
आता कशा दिसणार, ढगांच्या गमती ?



कोलंबस



बाजूला होते डोंगर
मध्येच मोठे तळे
तळ्यातले पाणी होते
निळे, निळे, निळे

पाण्यात डोंगर, झाडे
दिसत होती उलटी
बोटीला फुटली होती
भली मोठी शेपटी



खालीवर करती लाटा
चमचम करते ऊन
सुळकन् पळे मासा
कसे ठेवू पकडून ?

तेवढ्यात आला नेमका
हा ऽ वादळी वारा
आईचा जीव अगदी
झाला घाबराघुबरा


म्हणते कशी मला
'तू चित्रासारखा बस'
मी म्हटले, 'हॅट,
मी आहे कोलंबस !'

पत्र



कितीतरी दिवसांत
आजी नाही भेटली
आजीसाठी नात
फुरंगटून बसली

शेवटी घेतले तिने
पत्र लिहायला
शब्दासाठी कोण
बसणार अडायला ?




आजी, तुझी मला
आठवण येते फार
उभ्या आडव्या रेषा
तिने ओढल्या चार




आईने लिहिला पत्ता
पोस्टात पत्र गेले
रेषांचे वळण नेमके
आजीलाही कळले !

आजी आली धावत
नातीला मारली मिठी
आगळ्यावेगळ्या पत्राचे
तिला कौतुक किती !

नवे शब्द



पेरू हिरवा, कैरी हिरवी
गवत हिरवे - हिरवे
मरवा हिरवा, दूर्वा हिरवी
पाचू हिरवे-हिरवे





कुठे रंग पिवळट हिरवा
कुठे फिकट हिरवा
कुठे असतो निळा-हिरवा
कुठे गडद हिरवा




माझ्या बागेमध्ये आता
कित्ती हिरव्या छटा...
हिरवा एक, हिरवा दोन
मोजू की काय आता ?

काळसर हिरवा, 'हिरवाकुट्ट'
निळसर हिरवा 'हिरवाशार'
नवे शब्द सुचवायला
आहेच मी तैयार !






दुर्बिणीतून




दुर्बिणीतून बघताना
एकेक गंमत दिसते
सूर्यावरून बुधाचे
टिंब रांगत जाते



आकाश दिसते खोल
दिपून जातात डोळे
एरवी दिसत नाही ते
दिसते आगळेवेगळे

लांबचे डोंगर, शेते
नदी नि रस्ते, घरे
एका क्षणामध्ये कसे
जवळ येते सारे

सारे जग जेव्हा असे
नजरेसमोर असते
काळ-अंतर-वेग यांचे
गणित आवडू लागते.



जिना




घरापेक्षा घराबाहेर
मी रमते जास्त
घरापेक्षा जिनाच
आहे माझा दोस्त

उगाचच चढउतर
हा तर माझा खेळ
उड्या मारत चढताना
मजेत जातो वेळ !


कठड्यावरून सुर्रकन
उतरते मी जिना
लपाछपी खेळताना
लपते तिथेच पुन्हा !

टॉमीचा तर मला
वाटतो अगदी हेवा
मुटकुळे करून तिथे
असतो बघावे तेव्हा !



छान रंग दिल्यावर
जिना दिसतो नवा
पणजी म्हणते, 'स्वर्गात
जायला जिनाच हवा !'

शोध



हिरव्यागार मेंदीची
हातावरची नक्षी लाल !
छोट्याशा बीमधून
झाड होते डेरेदार !



सरड्याच्या अंगावरचे
रंग कसे बदलतात ?
अंधारात मांजराचे
डोळे कसे चमकतात ?



दोरीशिवाय ढगांचा
झुंबर टांगला कोणी ?
समुद्राचेच फक्त का
खारट असते पाणी ?

इंद्रधनुष्याचे रंग
लपतात कुठे सगळे ?
रोजचेच शब्द कवितेत
वाटतात कसे वेगळे ?



अवतीभवती खरं तर
आहे प्रयोगशाळा
जाता-येता घेईन शोध
नका हं अडवू मला !

थंडीमधल्या उन्हाशी

थंडीमधल्या उन्हाशी
आहे माझी गट्टी
कोवळ्या पानांवर ते
दिसते कसे पोपटी



पानांमधून त्याची
चाले लगबग सारखी
निळ्या पाण्यावरती
ते दिसे मोरपंखी

पडद्यामागून घरात
कवडसा डोकावतो
ऊन मुठीत धरायचा
खेळ माझा रंगतो

ऊन मोठे लबाड
येत नाही मुठीत
ऊब आल्यावरती
मी असते खुषीत !



चाकावरच्या घरात



आज इथे, उद्या तिथे
रोज येई गाव नवे
गाडीत मजाच मजा
खिडकीत बसून रहावे

गाडी धावते पुढे
मन अडके मागे
नवी घरे, नवे झरे
बोलाविती वेगे


कोण्या गावचे कोण
बसतात शेजारी
म्हणतात, 'पुढच्या सुट्टीत
नक्की या हं घरी !'

दिवस जातो, रात्र येते
गाडीच होते घर
चाकावरच्या घरात
मन ठरेना जागेवर

गाडीची अंगाई सुरू
साऱ्यांना झोप लागे
सगळ्यांसाठी मात्र
ड्रायव्हरकाका जागे !

सहल

हवीहवीशी हवा
निळे निळे डोंगर
राहात होतो आम्ही
ढगांच्याही वर




रंगीत फुलेच फुले
होती जिकडे तिकडे
लाल मातीवरती
हलका पाऊस पडे



इतके पडले धुके
सगळे झाले गुप्त !
धबधब्याचा आवाज
ऐकू येई फक्त !





डोळ्यापुढे अजूनही
दऱ्या खोल खोल...
घरात चालतानाही
सावरते मी तोल !






घर



सहलीवरून घरी
आले आठवड्याने
दारावरचे कुलूप
हसले आनंदाने !




गेल्या गेल्या आधी
झाडांना घातले पाणी
तालामध्ये पाने
गाऊ लागली गाणी



भिंतीवर फिरवला हात
फोनला म्हटले, 'हॅलो,
आठ दिवस आम्ही
मजा करून आलो !'

सारे होते तसेच,
तरीही वाटले नवे !
सुट्टीमध्ये सहलीला
खरेच जायला हवे !



उडाणटप्पू

कुठे चालू कुकुच कूऽऽ
कुठे चाले कुहू कुहू
पहाटेच्या अशा वेळी
मी कशी गप्प राहू ?



ताजी हवा खात मी
एका दमात चढते टेकडी
एक माकड नेमके तेव्हा
झाडावरती घेते उडी !

हळूच येतो एक किरण
चिंचेची पाने पाचूची !
पायांना वाटते मजाचमजा
लुसलुशीत गवताची



पहाटेची वेळ मला
छान उडाणटप्पू करते
सुट्टीमध्ये दिवसभर
तीच लय अंगात भिनते !



कैरी



बाबा आणतात मंडईतून
टणक, मोठी, हिरवी कैरी
'पन्हं' करू की करू सार ?'
आईला पडतात प्रश्नच भारी !

मी घेते कैरी हातात
हिरव्या रंगात जाते बुडून
हलकेच फिरवते हात
वासही घेते मन भरून.


आईला म्हणते हळूच मी,
कच्चं खाणं चांगलं ना ?
दिवसभर आम्हाला तू
मीठ नि कैरीच दे ना !'



अखखी कैरी असते तशीच
अजून चिरलीसुद्धा नाही
तरी कशाने तोंड माझे
आंबटतुरट होत राही ?



तळे



बागेमध्ये आहे एक
खूप मोठे तळे
तळ्यामध्ये आहेत
लाल-पांढरी कमळे



कमळे डुलती पाण्यावर
भुंगा मागून धावे
काय त्यांचे गुपित चाले
वाऱ्यालाच ठावे

तळ्याच्याच काठाशी
आहे एक गुलमोहर
लालबुंद पडते त्याची
सावली त्या पाण्यावर






जोरात येते झुळूक
पाणी हसू लागते
तरंग पसरत जाताना
तळेच कमळ बनते !

बाळ





आई एके आई
आई दुणे आई
आईशिवाय बाळाला
जरा करमत नाही





एकटेच आवाज काढते !
मला तर वाटते चक्रम !
भूक लागणे हाच
याचा मोठा पराक्रम !






याच्या फिरण्यासाठी
सारी तयारी जय्यत
मी आपला बिचारा
बसतो पाढे म्हणत !



माझ्याकडे लाडात जेव्हा
बघते बाळ हसून
त्याच्यावरचा सारा राग
जातो मी विसरून !



गरवारे बालभवनची मुलांसाठी
सुंदर दुर्मिळ पुस्तकं



कि.रु.१५/-



कि.रु.१५/-



कि.रु.२०/-



कि.रु.१५/-



कि.रु.१०/-



कि. रु. १०/-


कजा कजा मरु प्रकाशन

गरवारे बालभवन, सारसबागेसमोर, पुणे - ४११००२. फोन : २४४४२१०९.

गरवारे बालभवनची मुलांसाठी
सुंदर दुर्मिळ पुस्तकं



कि.रु.१०/-



कि.रु.१५/-



कि.रु.१०/-



कि.रु.१५/-



कि. रु. १०/-



कि.रु.१०/-

कजा कजा मरु प्रकाशन

गरवारे बालभवनची मुलांसाठी
सुंदर दुर्मिळ पुस्तकं

शिनची तीनचाकी सायकल


तातसुहारू कोडामा



कि.रु.१५/-

बोबक बकरा

मनरो लीफ



कि.रु.१५/-

जॉनी ॲपलसीड

अलीकी



Johnny Appleseed

Aliki

कि.रु.१५/-

अमर पत्र

चीफ सिएटल




Web of Life

Chief Seattle

कि.रु.१५/-

पाच चिनी भाऊ

क्लेअर हचिट बिशप आणि कुर्त वीज



कि. रु.१५/-

कजा कजा मरु प्रकाशन